# दामोदर पंडितांच्या वच्छाहरण काव्यरचनेतील कथापरिपोष

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता.चाकूर जि.लातूर

वच्छाहरण हे दामोदर पंडितांचे काव्य महानुभाव पंथातील सातीग्रंथापैकी एक उत्कृष्ट काव्य आहे .महानुभाव पंथाने विपुल आणि विविध स्वरूपाची ग्रंथरचना करून मराठी भाषेची फार मोठी सेवा केली आहे. लीळाचरित्रासारखा सर्वांग सुंदर चरित्र ग्रंथ महाईंभटाने लिहिला, तर महदंबेने आपल्या बोलीभाषेत धवळ्यांची निर्मिती केली. नरेंद्र पंडितांचे रुक्मिणीस्वयंवर आणि भास्करभट्टांचा शिशुपालवध ही दोन काव्य संस्कृत महाकाव्याच्या तोडीची आहेत. याशिवाय उद्धवगीता, ज्ञानप्रबोध यासारखे टीकाग्रंथ, सह्याद्रीवर्णन, ऋद्धिपुरवर्णन यासारखे स्थलमहात्मे वर्णन करणारे ग्रंथ महानुभाव पंथाच्या विविधतेत भर घालतात. दृष्टांतपाठ या ग्रंथात यादवकालीन मराठी संस्कृत संस्कृतीचे उत्कृष्ट प्रतिबिंब उमटले आहे. रत्नमालास्तोत्र ही संस्कृत भाषेतले चक्रधरांचे चरित्र केशिराजबासांनी लिहिले. थोडक्यात चरित्र, आत्मकथन, आख्यान, महाकाव्य, टीकाभाष्य, सूत्रग्रंथ, दैनंदिनी, आरत्या, चौपद्या, ध्रुवा, स्तोत्र असे विविध प्रकार महानुभाव कवींनी व ग्रंथकारांनी हाताळले आणि मराठी गद्य-पद्य याची उत्कृष्ट निर्मिती केली. दामोदर पंडितांचे वच्छाहरण हे महानुभाव कवी दामोदर पंडित यांचे एक उत्कृष्ट भक्ती काव्य आहे. श्रीकृष्ण भक्ती व चक्रधर भक्ती ही महानुभाव वाङ्मयाचे मुख्य प्रेरणास्थान आहे. श्रीकृष्ण व चक्रधर यांचे चरित्र व तत्वज्ञान ही महानुभाव पंथाच्या वाङ्मयाची मुख्य प्रेरणा आहे. श्रीकृष्ण कथेवर आधारीत भक्तिकाव्य दामोदर पंडितानी 503 ओव्यात लिहिले आहे. या कथेचा उगम 'श्रीमदभागवत' या महापूराणात आहे. भागवताच्या दशमस्कंधात श्रीकृष्णचरित्र आलेले आहे. त्यातील 12,13,14 व्या अध्यायात आधासूरवधाची, वच्छाहरणाची कथा आली आहे. मूळ भागवतात या कथा श्रीकृष्ण चरित्राचा एक भाग म्हणून आल्या आहेत. मूळात श्रीकृष्ण चरित्र अतिशय अदभूत आणि भक्तिरसपूर्ण आहे. त्यातील अधासूरवधाची कथा आणि वच्छाहरणाची कथा दामोदर पंडितानी निवडून त्यावर स्वतंत्र काव्यरचना केली आहे. आख्यानकाव्याचे हेच वैशिष्ट्य असते. पुराणातील एखादे कथासूत्र घेऊन आपल्या प्रतिभेने स्वतंत्र व परिपूर्ण अशी काव्यरचना करीत असतो. त्यादृष्टीने दामोदर पंडितांनी मूळातल्या आतिशय लहान कथेचा आपल्या कल्पकतेने अतिशय सुंदर विस्तार केला आहे. भागवतात वच्छाहरणाची कथा तीन अध्यायात आणि 169 श्लोकात आली आहे; पण दामोदर पंडितांनी त्यांचे रूपांतर ५०३ ओव्यात केले आहे. कथेला प्रारंभ करण्यापूर्वी चक्रधर, नागदेवाचार्य यांना आदराने नमन केले आहे. तसेच श्रीकृष्ण कथेची महती गाऊन सर्व संतांना व सज्जनांना ही कथा ऐकण्याचे आवाहन केले आहे व नंतर मुख्य कथेला सुरुवात केली आहे. अशात-हेने एक स्वतंत्र काव्य निर्माण करण्याची महत्त्वकांक्षा या काव्यात आढळते. महानुभाव पंथात नागदेवाचार्यांच्या प्रेरणेने ज्या विद्वान मंडळींनी प्रवेश केला त्यात दामोदर पंडित हे होते. दामोदर पंडित आणि त्यांची पत्नी हिरांवा या दोघांनीही महानुभाव पंथाची दीक्षा घेतली होती. सुरुवातीस हिरांवांने महानुभाव पंथात प्रवेश केला पण घरगुती अडचणीमुळे दामोदर पंडितांनी येण्याचे टाळले. अडचणीचे निवारण झाले तरी दामोदर पंडितांनी नागदेवाचार्याकडून महानुभाव पंथांची दीक्षा घेतली. हिराइसा व दामोदर पंडित या दोन पती-पत्नीत नेहमीच खटके उडत असत. अर्थात दामोदर पंडितांची निष्ठा किती प्रखर आहे. हेच या दोन पती-पत्नीच्या संबंधातून सिद्ध होते दामोदर पंडित अतिशय विद्वान होते. संस्कृत भाषेवर आणि मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. दामोदर पंडितांचे जिवलग मित्र म्हणजे केशीराजबास हे होते. या दोघात संस्कृतमध्ये वादविवाद होत असत. केशराज बास हे महानुभाव पंथाच्या आचार विचाराचे आणि तत्त्वज्ञानाची मांडणी करणारे फार मोठे ग्रंथकार होते; पण दामोदर पंडितांची

व त्यांची गाढ मैत्री होती. म्हणूनच दामोदर पंडितांनी रत्नमालास्तोत्र हा ग्रंथ लिहिला नाही. हा ग्रंथ केशराजबास यांनी लिहिला. तथापि मित्र प्रेमाखातर केशराजबासांनी या ग्रंथांच्या शेवटी हा ग्रंथ दामोदर पंडितांनी लिहिला आहे असे म्हटले आहे. केशिराजबासांच्या निधनानंतर दामोदर पंडितांनी केशिराजबासाच्या वियोगाचे दु:ख हलके करण्यासाठी वच्छाहरण हे काव्य लिहिले आणि या काव्याचे कर्तृत्व केशिराजबासास दिले. अशी या दोन पंडितांमध्ये गाढ मैत्री होती. नागदेवाचार्यांचेही या दोघांवरही उत्कट प्रेम होते. महानुभाव पंथाचा प्रसार समाजात या दोघांमुळेच होऊ शकेल असा विश्वास नागदेवाचार्यांना वाटत असे नागदेवाचार्यावरही दामोदर पंडिताचे अतूट प्रेम होते. नागदेवाचार्यांच्या निधनानंतर दामोदर पंडितांनी त्यांचा शोक व्यक्त करणारे 'धुवा' नावाचे काव्य लिहिले. दामोदर पंडित जसे विद्वान होते. तसेच ते उत्कट, उत्कृष्ट गायक होते. दामोदर पंडित संगीताचे प्रेमी होते. फावल्या वेळात ते चक्रधरांची गीते गात असत; पण महानुभाव पंथात गायन वर्ज्य होते. नागदेवाचार्यांनी दामोदर पंडितास या गोष्टीची जाणीव करून दिली, तरी पण एकदा एकांतात रागात दामोदर पंडित सद्गदित होऊन चक्रधरांचे गुणविशेष गात होते. त्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. नागदेवाचार्यांनी हे दृश्य पाहिले आणि तेव्हापासून त्यांना गायनाची परवानगी दिली. थोडक्यात महानुभाव पंथाची जडणघडण ज्यांच्या प्रयत्नामुळे झाली त्यात दामोदर पंडितांचा फार मोठा वाटा आहे. वच्छाहरण या काव्याप्रमाणेच चौपद्या हा काव्यप्रकार दामोदर पंडिताने हाताळला वच्छाहरण हे काव्य शके 1227 मध्ये लिहिले असे मानले जाते; पण डॉ. कोलते यांच्या मताप्रमाणे हे काव्य शके १२३८ मध्ये लिहिले गेले असावे वच्छाहरण याचा अर्थ गाईची वासरे आणि गोप बालक यांच्या हरणाची कथा होईल ही कथा मूळ भागवतात कृष्णाच्या वृंदावनातील लीला वर्णन करण्याच्या निमित्ताने आली आहे. श्रीकृष्ण म्हणजे परमेश्वराचा अवतार हा अवतार गोकुळात जन्मला. श्रीकृष्ण लहानपणापासूनच लोभसवाना खेळकर होता. सर्व गोकुळातल्या तो नर नारींचा लाडका होता. तो जेव्हा मोठा झाला तेव्हा आपल्या सवंगड्याबरोबर गाई चारण्यासाठी रानात जात होता. निरनिराळी खेळ खेळत, विविध वाद्य वाजवीत हे गोपाळ रानात जात असत. आपले शरीर रानफुलांनी सुशोभीत करीत असत. स्वत: श्रीकृष्ण मोराच्या पंखाची टोपी परिधान करीत असत. गळयात रानफुलांच्या माळा कृष्णाने परिधान केल्या आहेत आणि आपल्या मीत्रांबरोबर विटी-दांडू,चेंडू- फळी असे खेळ खेळत चालला होता. एवढयात कंसाने पाठवलेला अधासूर नावाचा राक्षस वृंदावनात आला. त्याने पर्वताकार अधासूराचे रूप धारण केले व तो श्रीकृष्णाच्या वाटेवर पडून राहीला. श्रीकृष्णाचे मित्र गोपाळ यांना तो एक पर्वतच आहे असे वाटले. असे समजून गोपाळांनी आधासुराच्या मुखात प्रवेश केला. त्या राक्षसाने आपले तोंड मीटून गोपाळांना ठार मारले असते. पण तेवढ्यात श्रीकृष्णाची गाय त्यास दिसली. श्रीकृष्णालाही गीळून टाकावे म्हणून आधासूराने आपले तोंड तसेच उघडे ठेवले. श्रीकृष्णाने आधासुराच्या मुखात प्रवेश केला आणि आपल्या मायावी शक्तिने आपले शरीर इतके मोठे केले की, त्याने आधासुराचे शरीर चिरले गेले आणि सर्व गोपाळ गाईवासरांसह सुरक्षीत बाहेर पडले. अशा त-हेने कृष्णाने -आधासुराचा वध केला. आणि त्यास मुक्ती दिली. असे कवी वर्णन करतो. त्यानंतर श्रीकृष्ण सर्व गोपाळांना व वासरांना घेऊन वृदांवनात आला. वृंदावन नैसर्गीक दृष्ट्या अतिशय सुंदर होते. श्रीकृष्ण परमात्मा वृंदावनात खेळत असल्यामूळे अनेक वृक्ष, पशुपक्षी यामूळे हे वृदांवन सुशोभित झाले होते. श्रीकृष्ण यमुनेच्या काठी आला. श्रीकृष्णाला पाहताच यमुनेचे पाणी व त्याच्या लाटा येत होत्या. यमुनेचे वाळवंट तर यमुने काठच्या वाळूमूळे अतिशय सुंदर दिसत होते. अनेक साधक यमुनेच्या काठी साधना करीत होते. श्रीकृष्णाने यमुनेच्या काठावर भोजन करावयाचे ठरवले. सर्व गोपाळ कृष्णाच्या भोवताली वर्तुळाकार बसले. त्यांनी आपापल्या शिदो-या सोडल्या आणि झाडांची पाने आणून सर्व पदार्थ वाढून घेतले. कृष्णानेसुध्दा आपल्या तळहातावर दही, भात, लोणची घेतली होती आणि सर्व गोपाळांची थट्टा मस्करी करत कृष्ण जेवत होता.त्यावेळी तो अतिशय सुंदर दिसत होता. श्रीकृष्णाच्या सहवासात हा जो आनंद मिळत होता ते पाहून स्वर्गातील देवांना हेवा वाटू लागला. त्यातल्यात्यात ब्रम्हदेवास आधासुराच्या मृत्युमुळे फारच आश्चर्य वाटले. श्रीकृष्ण खरोखरच देव आहे किंवा नाही. याबद्दल ब्रम्हदेवाच्या मनात शंका निर्माण झाली. आणि यानी श्रीकृष्णाची परिक्षा पाहवयाचे ठरवले. श्रीकृष्ण सर्व गोपाळासमवेत आनंदाने वनभोजन करत असता सर्व वासरे चरत- चरत दुर गेली. आणि त्यांना शोधण्यासाठी श्रीकृष्ण गेला. तेवढयात ब्रम्हदेवांनी ही वासरे चोरून नेली. श्रीकृष्ण पुन्हा भोजनाच्या

ठिकाणी आला तर काय ब्रम्हदेवाने गोपाळाचेही अपहरण केले; पण श्रीकृष्णाने ही गोष्ट कुणालाच कळू दिली नाही. गोकुळात गोपाळांची,वासरांची जशीच्या तशी रूपे निर्माण केली आणि सर्वांसह कृष्ण गोकुळात आला. गोकुळातील लोकांना श्रीकृष्णाचे हे नाटक मुळीच समजले नाही. इतकी हुबेहूब रूपे कृष्णाने धारण केली. गाई-वासरे यांना कृष्णाचा अतिशय लळा लागला होता. कृष्णाने बासरी वाजवताच दूर-दूर असलेल्या गाई चवताळून उधळत कृष्णाकडे येत आसत. श्रीकृष्णाची ही लीला वासूदेवाला कळली नाही. एक वर्ष उलटून गेले गोकुळात काय चालले असेल हे पाहण्यासाठी ब्रम्हदेव आला, तर त्यास गोकूळात आनंदाचा जल्लोष दिसू लागला. आणखी एक गंमत म्हणजे ही सर्व वासरे व गोपाळ ब्रम्हदेवाला श्रीकृरूणाच्या रूपात दिसू लागली. इतकेच नव्हे तर प्रत्येक वासराजवळ एक ब्रम्हदेवही दिसू लागला. हे पाहून ब्रम्हदेव भांबावून गेला. काय खरे असा प्रश्न त्याच्या समोर निर्माण झाला. आपण चोरून नेलेली वासरे व गोपाळ ही तर ब्रम्हलोकात जशीच्या तशी आहेत. आणि गोकूळात येऊन पहावे तर सर्व गोपाळ आणि वासरे जशीच्या तशी आहेत. यातील कोणता ब्रम्हदेव खरा असा प्रश्न ब्रम्हदेवासमोर निर्माण झाला. शेवटी नारदाने ब्रम्हदेवाकडे येऊन त्यांचा संशय दूर केला. सर्व जग -श्रीकृष्ण रूपच आहे. हे समजावून सांगीतले आणि श्रीकृष्णाला शरण जाण्यांची विनंती नारदाने केली. ओंजळी वासून ब्रम्हदेव श्रीकृष्णाकडे आला. त्याचा सर्व संशय दूर झाला. त्याने श्रीकृष्णाची क्षमा मागीतली आणि श्रीकृष्णाची स्तुती केली. श्रीकृष्ण मुळात निर्गुण- निराकार आहे; पण भक्ताच्या उध्दारासाठी त्याने अवतार घेतला आहे व तो आपल्याला माफ करेल. असे ब्रम्हदेवाने श्रीकृष्णाची स्तुती केली व ते सत्यलोकात गेले. व गोपवासरे सत्यलोकात आणून दिली. व श्रीकृष्णाचा निरोप घेतला. त्याप्रसंगी स्वर्गातील देवयानीने पुष्पवृष्टी केली. खऱ्या गोपवासरांना घेऊन श्रीकृष्ण गोकूळात परत आला. तेव्हा सर्व गोपाळ घरोघर जाऊन श्रीकृष्णाने आज आपल्याला अजगराच्या संकटातून कसे वाचवले हे सांगू लागले. तेव्हा त्यांना काय प्रकार आहे हेच कळेना. आणि मग श्रीकृष्णाच्या अलौकीक लीला लक्षांत घेऊन सर्व गोकूळ वासीयांनी कृष्णाचे चरित्र गाईले. अशा प्रकारे दामोदर पंडितांच्या वच्छाकरणाचे कथानक असून त्यात उत्कृष्ट भक्तिरस आहे.

भागवतातील मूळ कथा सांगातना दामोदर पडतांनी त्यात अनेक बदल केले आहेत. काही ठिकाणी विस्तारही केला आहे. मूळातील कथेत जे जे प्रसंग आहेत ते ते वर्णन करताना कवीने या प्रसंगाचा भक्तिपर अर्थ लावला आहे. उदा: दामोदर पंडिताने अधासूर वधाचा प्रसंग वर्णन करताना असे म्हटले की, देव भक्ताच्या रक्षणासाठी आणि दुष्टांच्या निर्दालनासाठी अवतार घेतो. इतकेच नव्हे, तर परमेश्वराच्या सहवासात दुष्टांचेही दुष्टत्व संपून जाते. व तेही मोक्षाला प्राप्त होतात. म्हणूनच आधासूराच्या मुखात प्रवेश करताच अधासूराचे अधासूरपण गेले. व तो आत्मस्वरूप झाला. "श्रीकृष्णरूप हदयी प्रवसले,तव आधासूरपण गेले, आत्मस्वरूप निर्मल झाले,नेमे सत्यधाने आत्मा तेजपुंज निगाला, तेथेची श्रीकृष्णी लया गेला, जैसा सरिता समुद्र भिनला सागरासि." मूळ कथेत श्रीकृष्णाने अधासूराचा नाश केला. एवढेच वर्णन आहे. पण कवीने हा प्रसंग भक्तिरसाच्या पातळीवर नेला आहे. श्रीकृष्णाच्या दर्शनाने अधासुराची राक्षसी प्रवृत्ती केंव्हाच नष्ट झाली. आणि तो आत्मरूप झाला. अशा त-हेचे वर्णन कवीने केले आहे. वनभोजनाच्या आनंदात सर्व गोपाळ एकमेकांची मस्करी करत जेवत होते. तेवढयात चरत- चरत गाईची वासरे दूर गेली. तेव्हा श्रीकृष्ण त्यांना शोधण्यासाठी गेला.त्या प्रसंगाचे वर्णन करताना कवी लिहितो, गोपाळ जेवता जेवता आनंदात इतके मग्न झाले की, ते 'मी' 'माझे' ही भावना विसरून गेले. गोपाळ केवळ भोजन करीत नव्हते, तर ब्रम्हरसाचे सेवन करीत होते. असे कवी वर्णन करतो. अशा तऱ्हेने साध्या प्रसंगातही कवी भक्तिची छटा आणतो."गोपाल प्रसाद भोजने आनंदले। मि माझे विसरले।तव देओचि पावेया निगाले। वासरु आते(259) गोपाळ 'मी' 'माझे' पणाला विसरले. म्हणूनच श्रीकृष्ण वासरांना पाहण्यासाठी निघाला.

सारांश

मूळ कथेत कांही प्रसंग साध्याच पद्धतीने वर्णन केलेली आसतात; पण दामोदर पंडिताने त्यास पंथीय तत्वज्ञानाचा आधार दिलेला आसतो. उदा. ब्रम्हदेवाने श्रीकृष्णाची परिक्षा पाहावयाचे ठरविले आणि तो मृत्युलोकात आला. हा प्रसंग चित्रित करताना दामोदर पंडिताने ब्रम्हदेव हा महानुभाव पंथातील देवतांच्या संकल्पनेप्रमाणे वर्णन केला आहे. जर ते महानुभाव पंथात परमेश्वर नित्यमुक्त असून, देवता असून ती नित्यबद्ध आहे; पण आपल्या उद्धारासाठी ती

श्रीकृष्णास्त शरण आली. ब्रम्हदेवाने श्रीकृष्णाची अनेक प्रकारे, स्तुती केली. तो म्हणतो," जे नेणति तुझा पंथू । ते पडिले संसारवनातू । जेयाचा आम्ही नेणो प्रांतू । ब्रम्हा म्हणे ॥ ४४ ॥" . अशा प्रकारे कवीने नकळत ब्रम्हदेवाने केलेल्या स्तुतिला महानुभाव पंथाच्या तत्वज्ञानाची छटा प्राप्त करून दिली आहे. श्रीकृष्णाच्या विज्ञान शक्तीचा आणि विदया शक्तिचा उल्लेख कवीने या काव्यात केला आहे. विज्ञान शक्ति हा खास महानुभाव पंथातलाच शब्द आहे. थोडक्यात मूळ भागवतातील कथेत दामोदर पंडितांनी जे बदल केले आहेत. त्यात महानुभाव पंथातील भक्ति कल्पनेचा फार मोठा भाग आहे. बाकी कांही किरकोळ बदल आहेत. त्यात श्रीकृष्णाने सर्व वासरांची व गोपाळांची जी रूपे धारण केली. त्या वासरांच्या विविध जातीची, रंगाची अतिशय तपशिलवार 'चर्चा कवीने केली आहे. तसेच प्रतिरूप आसलेली वासरे आणि गोपाळ जेव्हा गोकुळात आले तेव्हा घरोघरी श्रीकृष्णाच्या सेवेसाठी सर्व वृद्धी-सिद्धी-देवता प्रगट झाल्या. अशा प्रकारे भक्तिरसाची निर्मीती करण्याकरिता कवीने मूळ कथेत सुंदर बदल केले आहेत. आणि कथेचा परिपोष साधला आहे.

**संदर्भग्रंथ :-**

1) (संपा.) वि. भि. कोलते, 'वच्छाहरण', इ.स. 1953
2) शिवाजी गऊळकर, 'प्राचीन मराठी आख्यानकविता : उद्गम आणि विकास', निर्मल प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती, 2000
3) अ.ना.देशपांडे, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', (भाग पहिला) व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, 1995
4) प्र. न. जोशी, 'प्राचीन मराठी वाङ्.मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, 1978
5) ल.रा.नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास', फडके प्रकाशन कोल्हापूर, सहावी आवृत्ती, 1997
6) डॉ. यशवंत साधू, यांनी केलेले मार्गदर्शन, इ.स. 2000